**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्र नगर, कोल्हापूर. ४१६००४**

***परिपत्रक क्र.कोविमं /माध्य. परीक्षा/एप्रिल मे-२०२१/श्रेणी तक्ते/ १८३ / दिनांक ०९/०४/२०२१***

***वाचा:-*** *संदर्भ:-* माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी)एप्रिल-मे २०२१ तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणतक्ते भरण्याच्या सूचनांबाबत या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप/परीक्षा/७६३१ दिनांक ०८/०४/२०२१ रोजीचे परिपत्रक

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, एप्रिल मे -२०२१ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या नियमित (Fresh) व पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते (Grade List) OMR पध्दतीप्रमाणे मंडळाच्या अधिकृत वितरण केंद्रामार्फत सर्व शाळांना वितरीत करण्यात आलेली आहेत. तरी सदरची नियमित व पुनर्परीक्षार्थी (Fresh & Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते बिनचूक भरुन ते वितरण केंद्रावरील प्रतिनिधीकडे निर्धारित वेळेत हस्तपोहोच जमा करण्यात यावेत. **उशीरा प्राप्त होणाऱ्या श्रेणी तक्त्याबाबत दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.** सदरचे श्रेणीतक्ते इतर कोणत्याही पाकिटात न भरता मंडळ कार्यालयाने पुरविलेल्या श्रेणी तक्त्याच्या (Grade List) पाकिटातच भरुन सदर श्रेणी तक्त्याचे पाकिट पाठवावे. तसेच श्रेणीतक्त्याच्या पाकिटावर ठळक अंकात शाळेचा सांकेतिक क्रमांक लिहावा. श्रेणीतक्ते वेळेत जमा न केल्यास विद्यार्थ्यांच्या निकालाचे कामात काही समस्या निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**श्रेणीतक्ते भरताना घ्यावयाची काळजी -**

१) पुनर्रचित अभ्यासक्रमाद्वारे नियमित (Fresh) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते OMR पध्दतीने भरावयाची असल्यामुळे नियमित विद्यार्थ्यांना या पध्दतीनुसार श्रेणीतक्ते देण्यात आलेली आहेत. (अ) सदरहू श्रेणीतक्त्यामध्ये हे **P1 (Physical Education)** & **R7 (स्वविकास व कलारसास्वाद)** हे शालेय विषय सक्तीचे असल्यामुळे त्यांचे विषय कोड श्रेणी तक्त्यात नमूद केलेले आहेत. या विषयाच्या खालील चौकटीमध्ये आतील चौकटीला स्पर्श न करता खालीलप्रमाणे अंकामध्ये (Numeric Code) श्रेणी नोंदविण्यात याव्यात. फक्त गैरहजर विद्यार्थ्यांसाठी **A** अशी श्रेणी नोंदविण्यात यावी. श्रेणी तक्ते भरताना **कोणत्याही परिस्थितीत व्हाईटनरचा वापर करणेत येवू नये .**

२) श्रेणीतक्ते भरताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर शालेय व ऐच्छिक विषयाचे सांकेतांक (Index No.) नमुद करून त्या विषयात विद्यार्थ्याने संपादित केलेली श्रेणी (Grade) अंकामध्ये (Numeric Code मध्ये) अचूक नोंदवाव्यात. श्रेणीतक्त्यात श्रेणी नोंदविताना श्रेणी तक्त्याच्या खाली मुद्रित करण्यात आलेल्या सूचना काळजीपूर्वक लक्षात घेऊन खालील प्रमाणे श्रेणीची नोंद करावी.

- A ग्रेडसाठी 3 (60% & above marks)
- B ग्रेडसाठी 2 (45% & 59% marks)
- C ग्रेडसाठी 1 (35% & 44% marks )
- D ग्रेडसाठी 0 (35% & below marks)
- E ग्रेडसाठी 4 (Exempted subject )
- गैरहजरसाठी विद्यार्थ्यासाठी A
- दिव्यांग अस्थिव्यंग विद्यार्थ्यांसाठी 5 (फक्त शारीरीक शिक्षणा विषयाकरीता) (मात्र इतर विषयास श्रेणी द्यावी)
- मार्च २००८ पूर्वीचे परीक्षार्थी एप्रिल मे २०२१ च्या परीक्षेस रिपीटर म्हणून प्रविष्ठ होत असतील तर अशा विद्यार्थ्यांची R7 या विषयाची **N** श्रेणी दर्शवावी.

३ ) पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे शालेय वैकल्पिक विषयास पास श्रेणी मिळून त्यांचा तो विषय सुटलेला असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे श्रेणीतक्ते भरताना त्या विषयापुढे विषय सूटसाठी 4 (Exempted) अशी अंकात श्रेणी दर्शवावी.

४) काही पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी/ज्या विद्यार्थ्यांचे श्रेणी परीक्षेचे विषय सुटलेले नाहीत असे विद्यार्थी एप्रिल मे-२०२१ च्या परीक्षेस प्रविष्ठ होत असतील तर त्याचे श्रेणीतक्ते भरताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर ऐच्छिक विषयाचे कोड नंबर [P2 TO P5] यापैकी अथवा [P2 TO P9] यापैकी नमुद करून त्या विषयात विद्यार्थ्याने संपादीत केलेल्या श्रेणी चा क्रमांक (Grade) अचूक नोंदवावा.

५) **गैरहजर विद्यार्थ्यांसाठी A व ३५% पेक्षा कमी श्रेणी दर्शविताना ० श्रेणी लाल शाईने लिहाव्यात.** मात्र या श्रेणी लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यास **३५% पेक्षा कमी गुण व विद्यार्थी गैरहजर असल्याची खात्री करूनच श्रेणी लिहाव्यात.** मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की निकालानंतर 0 व A श्रेणी दिलेला विद्यार्थी लेखी परीक्षेस उत्तीर्ण असूनही केवळ या श्रेणी दिल्यामुळे त्यांचा निकाल अनुत्तीर्ण म्हणून जाहीर होतो. निकालानंतर शाळाप्रमुख श्रेणी दुरूस्ती व निकाल दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करतात. निकालानंतर कोणत्याही श्रेणीमध्ये व निकालात बदल केला जाणार नाही व विद्यार्थ्यास चूकीची श्रेणी दिल्यामुळे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शाळाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

**६) एप्रिल मे २०२१ परीक्षेकरीता काही विद्यार्थ्यांनी अतिविलंबाने आवेदनपत्रे सादर केलेली आहेत. अशा विद्यार्थ्यांची नोंद आपणांस पाठविण्यात आलेल्या GRADE LIST शीट च्या बैठक क्रमांकाच्या यादीमध्ये आलेली नाही. त्यामुळे GRADE LIST तक्त्यात शेवटी अशा विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक हाताने लिहून त्या बैठक क्रमांकासमोर विद्यार्थ्यांची शालेय व वैकल्पिक विषयांची श्रेणी द्यावी.**

**** महत्वाची सूचना ****

**उपरोक्त संदर्भिय पत्रामध्ये प्रात्यक्षिक व श्रेणी परीक्षेचे गुणतक्ते भरणे व साहीत्य वितरण केंद्रावर जमा करावयाच्या सूचनांमध्ये गुणपत्रिका पाकीट, ग्रेडलिस्ट पाकीट व प्रात्यक्षिक देयक पाकीट या प्रमाणे साहित्य जमा करावयाच्या सूचना दिल्या होत्या. त्यामध्ये प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लेखन कार्यासाठी उत्तरपत्रिका दिलेल्या आहेत. सदर लेखन कार्यासाठी दिलेल्या उत्तरपत्रिका ह्या उत्तरपत्रिका पाकीटात प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद करुन वितरण केंद्रावर जमा करावे. वितरण केंद्र प्रमुखांनी सदर पाकीटे जमा करुन घेऊन मंडळाकडे सादर करावीत.**

**(देविदास कुलाळ)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रति,**

**सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा प्रमुख व वितरण केंद्र प्रमुख सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हा.**